महापारेषण

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित



| | |
|---|---|
| कार्यालयाचे नाव | **मुख्य अभियंता (सं व सु) यांचे कार्यालय** |
| कार्यालयाचा पत्ता | प्रकाशगंगा, म.रा.वि.पा.कं.मर्या.,प्लॉट क्र.सी-१९,ई-ब्लॉक,बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पू.),मुंबई -४०० ०५१ |
| संपर्क | (का.) ०२२-२६५९ ५१५९ (फॅ.) ०२२-२६५९ ८५८७ |
| ई-मेल | ceoandm@ mahatransco.in |



संदर्भ : माराविपाकं/सांका/मुअ/संवसु/८८४९ दिनांकः ३ जुलै २०१३

**<u>नोंदणीकृत टपालाद्वारे</u>**

प्रति,
श्री.मोहम्मद नईम शेख
१४, राजीव गांधी स्टेडियम,
सेक्टर नं.३, सीबीडी बेलापूर,
नवी मुंबई - ४०० ६१४.

विषय : माहितीचा अधिकार अधिनियम - २००५ अंतर्गत आपण सादर केलेल्या प्रथम अपिलाच्या सुनावणीबाबत.

संदर्भ : १. आपले दि.१०/६/२०१३ रोजीचे प्रथम अपिल.
२. या कार्यालयाचे पत्र क्र.मराविपाकं/सांका/संवसु/माअ/८२७६ दि.२१/६/२०१३.

महोदय,

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत आपण सादर केलेल्या संदर्भ क्र. १ वरील प्रथम अपीलास अनुसरुन दि. २८.०६.२०१३ रोजी दुपारी ०३:०० वाजता प्रत्यक्ष सुनावणी आयोजित करण्यात आलेली होती. निर्धारित दिनांक व वेळेस सुनावणी घेण्यात आली.

सुनावणीमध्ये अपीलीय प्राधिकारी तथा मुख्य अभियंता (पारेषण सं व सु) यांनी दिलेल्या निर्णयाची प्रत सोबत माहितीस्तव जोडली आहे.

आपला विश्वासू,

सोबत – वरीलप्रमाणे

(ह.शं.गडलवार)

अपिलीय प्रधिकारी तथा
मुख्य अभियंता (पा.संवसु)

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा मुख्य अभियंता (पा.संवसु), म.रा.वि.पारेषण कंपनी मर्यादित मुंबई यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) प्रमाणे प्रथम अपील**

| अपीलकर्ता | | उत्तरवादी |
|---|---|---|
| श्री.मोहम्मद नईम शेख,<br>१४, राजीव गांधी स्टेडियम,<br>सेक्टर नं.३, सीबीडी बेलापूर,<br>नवी मुंबई - ४०० ६१४. | **विरुध्द** | श्री.श्रीकांत राजूरकर<br>शासकीय माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता-१<br>पारेषण संवसु, प्रकाशगंगा, मराविपाकंमर्या,<br>प्लॉट क्र,सी-१९,ई ब्लॉक,<br>बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,<br>बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१. |

| | | |
|---|---|---|
| १) ज्या आदेशाच्या विरुध्द अपिल केले आहे तो आदेश मिळाल्याची तारीख | : | १६ मे २०१३ |
| २) अपिल दाखल करण्याची अंतिम तारीख | : | १/७/२०१३ |
| ३) अपिल दाखल केलेली तारीख | : | १०/६/२०१३ |
| ४) अपिलीय अधिकारी यांना सदर अपिल प्राप्त झाल्याची तारीख | : | १७/६/२०१३ |

अपिलकर्ता यांनी दि. १०/६/२०१३ (प्राप्त दि. १७/६/२०१३) रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी पत्र क्र. मराविपाकं/सांका/संवसु/माअ/ ८२७६ दि.२१/६/२०१३अन्वये नोटीस काढून दि. २८.०६.२०१३ रोजी दुपारी ०३:०० वाजता प्रथम अपीलाची सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत कळविले होते. त्याप्रमाणे दि. २८.०६.२०१३ रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर राहिले. सदर सुनावणीमध्ये अपील अर्ज व मुळ अर्जातील मुद्यांची चर्चा झाली.

सदर प्रकरणामध्ये अपिलीय प्राधिकारी या नात्याने अर्जदार/अपिलार्थीने माहिती मागविलेल्या अर्जाच्या संबंधात माहिती अधिकार कायदा २००५ मधील तरतुदी व कलमांचा विचार करता खालील मुद्दे उद्भवतातः

१. अर्जदार/अपिलकर्ता यांच्या अनुमतीने सुनावणीच्या वेळी (दि.२८/६/२०१३ रोजी) दि.२/५/२०१३ च्या अर्जात मागितलेली माहिती अर्जदार/अपिलकर्ता यांना दि.५/७/२०१३ पर्यंत देण्याचे आदेश शासकीय माहिती अधिकारी तथा अधीक्षक अभियंता-१ (पा.संवसु) यांना दिले.

२. अर्जदार/अपिलकर्ता यांनी दि.१०/६/२०१३ च्या अपिल अर्जात नमुद केलेल्या प्रेअरमधील (Prayer of Applicant) अनु.क्र.२ तसेच, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम क्र.७ नुसार वरील मुद्दा क्र.१ संबंधीत माहिती विनाशुल्क देण्याचे ठरविले.

३. अर्जदार/अपिलकर्ता श्री.मोहम्मद नईम शेख यांनी स्वसंमतीने दि.२८/६/२०१३ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये वर नमुद केलेली माहिती प्राप्त झाल्यावर दि.१०/६/२०१३ च्या अपिल अर्जातील नमुद केलेल्या प्रेअरमधील (Prayer of Applicant) अनु.क्र.३ ते ६ संबंधीत मुद्दे मागे घेत असल्याचे नमुद केले. सबब, सदर अर्जासोबत वरील मुद्दा क्र.१ व २ ला अनुसरुन माहिती देत असल्याने अपिल अर्जातील प्रेअरमधील (Prayer of Applicant) अनु.क्र.३ ते ६ संबंधीत मुद्दयांचा विचार करण्यात येत नाही.

वरील मुद्दयांचा व माहितीचा अधिकार कायदा-२००५ यातील तरतुदींचा विचार करता प्रस्तूत अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

सदर अपिल निकाली काढण्यात येत आहे.

१) शासकीय माहिती अधिकारी तथा अधीक्षक अभियंता-१ (पा.संवसु) यांनी दिनांक २/५/२०१३ च्या अर्जात मागितलेली माहिती अर्जदार/अपिलकर्ता यांना दि.५/७/२०१३ पर्यंत देण्यात यावी.

२) सदर निकालाची प्रत अर्जदार/अपिलार्थीस देण्यात यावी तसेच कंपनीच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावी.

सदरील अपिलार्थीच्या माहितीसाठी, त्यांना या निर्णयाविरुध्द अपिल करावयाचे असल्यास त्याबाबत ''राज्य माहिती आयोग'' (State Information Commission) यांच्याकडे, माहिती अधिकार कायद्याचे कलम १९(३) अन्वये, सदरचा निकाल प्राप्त झाल्यापासून ९० दिवसांच्या आत दुसरे अपिल करता येईल. त्यासाठीचा पत्ता खालीलप्रमाणे आहे.

(अ) मुख्य माहिती अधिकारी, राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दूरध्वनी क्र. ०२२ २२८५६०७८

(ब) महाराष्ट्र माहिती आयोग, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला,
कौन्सिल हॉलच्या समोर, पुणे.

(signature)

अपिलीय प्रधिकारी तथा
मुख्य अभियंता (पा.संवसु)